# <u>सं.फौ.ख.क्र. २०१/२०१९ मधील निशाणी ०१ वरील आदेश</u>

फिर्यादीची लेखी फिर्याद तसेच न्यायालयीन अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या धनादेश, सदर धनादेश परत आल्याबाबत बॅकेचे रिटर्न मेमो, नोटीसीची स्थळप्रत, आरोपीला पाठविलेली नोटीस परत आल्याचा बंद लिफाफा आदी कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचे अवलोकन केले.

तसेच फिर्यादीद्वारा शपथपत्राव्दारे दिलेल्या जबाबाचे अवलोकन केले. फिर्यादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. लेखी फिर्याद, न्यायालयीन अभिलेखावर दाखल कागदपत्रे, फिर्यादीने शपथपत्राव्दारे दिलेला जबाब यावरुन फिर्यादीने परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ चे परंतुक/शर्त (अ) ते (क) तसेच कलम १४२ (ब) चे परंतुकाची/शर्तीची पुर्तता केल्याचे दिसुन येत असल्याने सकृतदर्शनी आरोपी विरुध्द परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ अन्वये केलेल्या गुन्हयाच्या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी पुरेसे कारण आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

## — आ दे श —

१. आरोपी विरुध्द परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ अन्वये गुन्हा केल्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ अन्वये आदेशीका काढण्यात यावी.

२. फिर्यादीने सदर आदेशाच्या तारखेपासुन ३ दिवसांच्या आत योग्य ते आदेशीका शुल्क व आरोपीस देण्याकरीता लेखी फिर्याद व न्यायालयीन अभिलेखावर दाखल अन्य कागदपत्रांची प्रत न्यायालयात दाखल करावी.

दिनांक :— १८/०६/२०१९.

(एस.एल.वैद्य)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
शिंदखेडा.